IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# सौंदर्य आकाशाचे

[1]**Name of 1st Author: Dr. Ashwini P. Dehadrai**

M.A,B.ED .M.PHIL PH.D

Marathi Department , Bhartiya Vidya Bhavan,Nagpur, Maharashtra, India

***Abstract:*** निसर्ग पंचमहाभूतांनी बनलेला आहे. पंचमहाभूतांना एक दुसऱ्याशिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. पृथ्वी आणि आकाश या दोन गोष्टींकडे विशेष लक्ष गेले. पृथ्वी अस्थाई परंतु खगोल मात्र चिरस्थायी आहे. क्षणो क्षणी त्या निळ्या पटलावरील रत्नजडित नक्षी बदलताना दिसते. आकाशाचे तिन्ही ऋतूतील सौंदर्य निरनिराळे असते. अशा सौंदर्यपूर्ण आकाशाचा वेध घेण्यासाठी हे लेखन.

***Key Words:*** निसर्ग पंचमहाभूतांनी बनलेला - आकाशाला महत्त्व- रत्नांनी झगमगणारे निळेजांभळे दालन- निसर्ग सौंदर्य- आकाशाचे सौंदर्य - चकोर चांदण्या साठी झुरतो- पावसाचे ढग आभाळभर- सुगंधी वार्ता- मन प्रसन्न- आकाशाच्या सौंदर्याकडे पाहून मन आकर्षित होते.

श्री गणेशाय नमः

# सौंदर्य आकाशाचे

निसर्ग हा पंचमहाभूतांनी बनलेला आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू , आकाश ही पंचमहाभूते आहेत. प्रत्येकाचे महत्त्व वेगळे आहे. पण या पंचमहाभूतांना एक दुसऱ्या शिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. सृष्टीच्या विराट दर्शनाने मानव आश्चर्यचकित झाला नाही तर नवलच. माणसाचे प्रथम दोन गोष्टींकडे लक्ष गेले. आकाश आणि पृथ्वीकडे. आकाशात ग्रह नक्षत्रांचा खेळ चाललेला असतो. धरतीच्या भूगर्भातील घडामोडींमुळे पर्वतमाला नाहीशा होऊन तिथे समुद्र दिसतो. पृथ्वीतलावरील सारेकाही अस्थिर आहे. परंतु

आकाशातील खगोल मात्र चिरस्थायी आहे.

आकाश हा शब्द उच्चारताच गदिमांची

**" अंश विष्णुचा राम, धरेची दुहिता ती सीता**
**गंधर्वाचे सूर लागले , जयगीता गाता**
**आकाशाशी जडले नाते ऐसे धरणी मातेचे**
**स्वयंवर झाले सीतेचे"**

गीत रामायण हे अजरामर कलाकृती डोळ्यासमोर येऊन या काव्यओळी आठवतात.

मारुती चितमपल्ली म्हणतात, **"आकाशाचं खरं दर्शन घ्यायचं ते पर्वतावरून किंवा वाळवंटी प्रदेशातूनच ." (१)** होय मारुती चितमपल्ली वनाधिकारी असल्यामुळे त्यांचे बहुतेक वास्तव्य जंगलात गेले. त्यांनी आकाशाचे जे सौंदर्य न्याहाळले ते पर्वत शिखरांवरन उंच डोंगर माथ्यावरून आणि गडांच्या चौथऱ्यांवरून. पर्वतावरून आकाश पाहिल्यामुळे तारे अधिक जवळ असल्यासारखे वाटतात . उतारांवरील आणि खोऱ्यांतील जंगलांमधील उंच वृक्षांवर अधांतरी लोंबत आहेत , असा भास होतो. असे सौंदर्य पहाण्यात चितमपल्ली गुंगून जातात. गो. नी. दांडेकरांसोबत चितमपल्ली हे एकदा पवन मावळातल्या तुंगी गडावर रात्रीच्या मुक्कामाला गेले होते. बरोबर आणखी दोघे तिघे होते. तुंगी हा टेहळणीचा गड आहे. तिथून आजूबाजूच्या सुमारे सोळा गडांचे दर्शन होते. तिथल्या एका पडक्या विहिरीजवळ बसून चितमपल्ली व मित्रमंडळी रात्रभर आकाशाकडे पहात जागत होते.

ना . धो . महानोर यांची कविता येथे आठवते,

**"सांजवताना, वाऱ्याच्या गंधगर्भ लयीनं ओथंबून येतं**
**हर्षोन्मादानं पानापानांतून हसताना सोन्याचं हसू सांडतं " (२)**

संध्याकाळच्या आकाशाचे सौंदर्य चीतमपल्लीनीं न्याहाळले त्यांनी ते सौंदर्य वर्णन करताना प्रतीकांचा उपयोग केलेला दिसतो. त्यांना गडावरून आकाशाच्या सौंदर्याचे खरे दर्शन घडले . वरती विशाल निळा घुमट, अष्टदिशा ग्रह नक्षत्रांनी व्यापलेल्या. त्यात काही तारे फार तेजस्वी, सुंदर तर काही मंद व मनोहर असे वर्णन चीतमपल्लीनीं केले आहे.

**"मी दुर्बिणीतून आभाळाकडे पाहिल्यावर जो देखावा दिसला, तो केवळ अपूर्व होता. ताऱ्यांची संख्या जास्त दिसू लागली.इतकंच नव्हे, तर काही ताऱ्यांचं तेजही विलक्षण दिसू लागलं. काही लाल मण्यायांसारखे दिसत, काही पाचूसारखे, काही नीलमण्यांसारखे, तर काही आपल्या तेजानं प्रत्यक्ष हिऱ्यालादेखील मागं टाकतील ."(३)**

ताऱ्यांचा प्रकाश जेवढा धरतीवर पडलेला दिसत नाही. तेवढा तो जंगलाच्या अंधाऱ्या रात्री जाणवू लागतो.

**"जंगलातील तळी, सरोवरं, जलाशय आणि दलदली यांभोवती रात्री आणि पहाटेच्या वेळी भटकताना मोठं गूढ वाटे. यक्षिणींचं आणि किन्नरीचं तिथं वास्तव्य असावं असं वाटे. साऱ्या साऱ्या आभाळाचं प्रतिबिंब पाण्यात पडलेले असे. वाटे की, हे जलाशय गुरु शुक्रांच्या डोळ्यांनी आपणाकडं पहात आहेत." (४)**

आकाशाच्या प्रतीबिंबा मुळे जलाशयात गुरु शुक्र हे ग्रह जमिनीवर अवतरले आणि ते आपल्याकडे पहात आहेत. हा विचार मनाला सुखावून जातो. या अद्भूत वर्णनाने मन प्रसन्न होते. चितमपल्ली पक्षी निरीक्षणाच्या छंदामुळे पहाटे पूर्वीच्या काळोखात तळ्याकाठी जात असत. त्यामुळे त्यांना बरेचदा ग्रहताऱ्यांनी भरलेल्या आकाशाचे मंगल दर्शन झाले. पाखरांना जाग येऊन त्यांचा मंजुळ आवाज केव्हा कानावर पडेल, त्याची वाट पाहात चितमपल्ली तळ्याकाठी उभे राहून आकाशाकडे पाहत असत. बरेचदा ते निरीक्षण करण्यासाठी उंच मनोऱ्यात रात्री बसलेले असत. डोक्यावर छप्पर नसे . चारीबाजूंनी घनदाट जंगल. याच्या तुकड्यात तेज:पुंज हिरे माणकादी रत्नांनी झगमगणारे निळेजांभळे दालन असे आपल्या डोक्यावर आहे असे वाटे. क्षणोक्षणी निळ्यापटलावरील रत्नजडित नक्षी बदलताना दिसायची. स्वर्भूसंगम ही संकल्पना केशवसुतांपासून अनेक आधुनिक कवींनी मांडली.' कल्पकता' ही सर्व कलांची जननीआहे. हे स्पष्ट करून ते म्हणतात,

**"आली भू कुतुके तिथे तिस तिने ते वस्त्र लेवविले;**
**तो त्या वृद्ध वसुंधरेवरि पहा! तारुण्य ओथंबले**
**भुदेवी मग हृष्ट होऊनि मनी, नाचावया लागली,**
**आता स्वर्ग मला स्वयेच वरण्या हे बोलली"(५)**

**अनुभव, सौंदर्य, कल्पना यांचा संगम झाला आहे. अशावेळी चितमपल्लीचे लेखन गद्यकाव्य वाटते. पानगळीच्या झाडाचे सौंदर्य वर्णन करताना चितमपल्ली लिहितात, "पानगळीच्या दिवसात सारे वृक्ष पर्णहीन झालेले असत. फक्त त्यांच्या फांद्या डहाळ्या यांची नक्षी आभाळाच्या पार्श्वभूमीवर कोरलेली दिसायची. क्षणात असा भास होई की, सह नक्षत्रांची पानंफुलं लेवून ही अलंकृत झालेली झाडं उभी आहेत. काळ्याशार डोहातील पाण्यात काठावरच्या झाडाचा देखणं, कंप पावणारं प्रतिबिंब पडलेलं असायचं."(६)** हे खरे तर पर्णहीन झाडे दृष्टीला बरे वाटत नाहीत. झाडांचे सारे सौंदर्य त्याच्या हिरव्या पसरलेल्या फांद्यामध्येच असते, पण चितमपल्लीना मात्र ही पर्णहीन झाडे ग्रह नक्षत्रांची पाने फुले ल्यायल्यामुळे आणखीनच सुंदर दिसतात. निसर्गात कुठेही कुरुपता नाही. हा विचार मार्मिक आणि महत्वाचा आहे. निसर्ग हा सौंदर्याची मुक्त

उधळण करीत असतो, पण त्याकडे पाहण्याचा सौंदर्याचा आस्वाद घेण्याचा दृष्टिकोन असावा लागतो. एकदा का जर हा दृष्टिकोन निर्माण झाला तर, निसर्गाच्या प्रत्येक घटकात असलेल्या सौंदर्यात आपण आकंठ बुडून जाऊ याची खात्री वाटते. या सौंदर्याच्या दृष्टीमुळे कुसुमाग्रजांनी तर ,'पृथ्वीचे प्रेमगीत' ही अप्रतिम कविताच लिहिली. सूर्य हे स्वर्गीय सामर्थ्याचे प्रतीक आहे.

**" अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्**
**मला ज्ञात मी एक धुलिकण (७)**

असे म्हणणारी पृथ्वी युगानुयुगे त्याच्यावर प्रेम करीत आहे. निसर्गावरील प्रेम वर्षानुवर्ष सुरू

आहे. तेच आकाश, तीच पृथ्वी, तोच समुद्र सर्व जरी जुने असले, रोजचे असले , तरी आपण त्यांच्यातील सौंदर्याने रोज आकर्षित होतो. त्यामुळेच पृथ्वीचे आणि आकाशाचे सौंदर्य आबाधित असावे, असे वाटते.

बालकवींना निसर्गाचा साक्षात्कार झाला होता. हे त्यांच्या आजही प्रसिद्ध असलेल्या कवितेतून आपल्याला दिसून येते.

**"नीलनभी नक्षत्र कसे**
**डोकावुनि हें पाहतसे;**
**कुणास बघते? मोदाला!**
**मोद भेटला का त्याला?(८)**

' आनंदी आनंद' या कवितेतील पहिल्या ओळी मराठी वाचकांच्या ओठावर अजरामर झाल्या आहेत.

**'आनंदी आनंद गडे!**
**इकडे तिकडे चोहिकडे,**
**वरती खाली मोद भरे;**
**वायूसंगे मोद फिरे"**

ते संबंधी कुसुमाग्रज लिहितात, **"माणसाच्या परमोच्च आनंदाचे निधान मानवी व्यवहारात नसून निसर्गसौंदर्याच्या निरामय आविष्कारात आहे, अशी बालकवींची श्रद्धा होती."(९)** निसर्गातील देण्याला घेण्याची अपेक्षाच नसते. परस्परांविषयी चा मत्सर नसतो.' मन आकाशासारखे मोठे असावे' त्या आकाशाकडून स्वीकारण्यास सारखे बरेच काही आहे.

चंद्र, सूर्य , तारका पृथ्वीवर नसल्या, तरी पृथ्वीचे सौंदर्य त्याने समृद्ध झाले आहे. ताऱ्यांच्या समूहाला नक्षत्र म्हणतात. तारकांचा प्रवेश केवळ आकाशात नव्हे , तर आपल्या मनातही होतो.

पौर्णिमेच्या रात्रीचा पूर्ण चंद्र आपले मन आकर्षित करतो. लिंबोणीच्या झाडामागे असलेल्या सुंदर चंद्राला पहात रहावसं वाटतं. चंद्र म्हणजे आकाशाला मिळालेला महत्त्वाचा अलंकाराच वाटतो. सुंदर स्त्रीच्या मुखाचंद्राचीं तुलना चंद्रबिंबाशी केलेली असते.अशा निसर्गातील उपमा सौंदर्य प्रेमी वापरताना आढळून येतात. चंद्राच्या आगमनाप्रमाणे समुद्राला भरती ओहोटी येते. पौर्णिमेचा चंद्र आकाशात कुठेही असला, तरी आपली वाट पाहत बाहेर उभा आहे, असे वाटते. पौर्णिमेच्या दाट चांदण्यात व चंद्रबिंबात सर्व संवेदना तरल होतात. प्रत्येक पोर्णिमेच्या पुर्णचंद्राचे वेगळेपण रम्य वाटते. चकोर चांदणीसाठी झुरतो, पक्षीही आकाशातील ताऱ्यांच्या सौंदर्याने आकर्षित होतात. जून महिन्याच्या सुरुवातीला चातक आपल्या निनादाने पावसाचे आगमन सूचित करतो. आकाशातील हालचालींनी मानवाला संदेश देण्याचे काम पक्षी करतात. पक्षांचा निसर्गवेध शाळा म्हणून आपण अभ्यास केल्यास आकाशातील घडामोडींचा अंदाज घेऊ शकतो.

निसर्गसौंदर्यात भर टाकतात ते सांजसकाळचे पूर्वपश्चिमेचे रंग रोजच मनाला सुखदायक वाटतात. वाऱ्याच्या झुळूकेचा स्पर्श आनंद देऊन जातात. पावसाच्या सरींच्या नादाने मन आकर्षित होते.

उन्हाळा संपतो आभाळ भरून येते. पावसाचे ढग आकाशभर पसरलेली असतात. उकाडा वाढतो. पण इतक्यात कुठून तरी मातीचा सुगंध येतो. आल्हाददायक वाऱ्याची झुळूक पाऊस आल्याची सुगंधी वार्ता देते. मन प्रसन्न होते. उन्हाळा पावसाळा हे ऋतू हातात हात घालून भटकंती करतात. वारे आणि ढग यांची हातमिळवणी झालेली असते. पावसाळ्यातील ढगांचा भारदस्तपणा आपल्या कृतीतून सुटत नाही. सावली आणि उजेड या दोघांनाही आपल्या पोटात साठणारे ढग उगवत्या सूर्याच्या लालीलाही थांबवतात. ढगांवरच्या छटेवरून सूर्योदय झाला, असे समजते.

सकाळ, दुपार ,संध्याकाळ हे तिन्ही त्रिकाळ आकाशातील ग्रहताऱ्यांच्या मुळे आपल्याला समजतात. आकाशातील इंद्रधनुष्याच्या सप्त रंगांचे अभिनव दर्शन घडते. उन्हाळा ,पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूत प्रकाशाचे सौंदर्य निरनिराळे असते. पहाटेची लाली वेगळी, दुपारचे ऊन वेगळे, संध्यासमयी चा संधीप्रकाश वेगळा. म्हणूनच तर सूर्योदय आणि सूर्यास्त पाहण्यासाठी निसर्गप्रेमी रसिक दूर दूर पर्यंत जाऊन आकाश सौंदर्य बघण्याची तहाण भागवत असतात. आकाशाच्या सौंदर्याने मानवी मनाला मोहून टाकले आहे.

या क्षणी ग. ह . पाटील यांची लहानपणी शिकलेल्या कवितेची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. काव्यओळी अशा -

**देवा तुझे किती सुंदर आकाश सुंदर प्रकाश सूर्य देतो**
**सुंदर चांदण्या चंद्र हा सुंदर चांदणे सुंदर पडे त्याचे**

बालपणी लागलेल्या आकाशाची ओढ आजही कायम आहे. तांत्रिक जीवन जगताना त्याकडे दुर्लक्ष झाले एवढंच. उन्हाळ्यातील रात्रीचे अंगणात झोपणे आता बंद झाले आहे. त्यामुळे बहीण भावा मधील चांदण्यांच्या आकृत्यांचे खेळ नाहीसे झाले. माझ्या मुलांना चांदण्यांच्या आकृत्यांचे खेळ खेळता येत नाही. ही खंत मनाला बोचल्या वाचून रहात नाही. सगळ्यांना निखळ सौंदर्याचा आस्वाद घेता आला पाहिजे. बालपणी पाठ केलेल्या कवितां सोबत निसर्गाचा घटक असलेल्या आकाशाकडे डोळे भरून पाहता आले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

**१. पाखरमाया:- मारुती चितमपल्ली**

**२. रानातल्या कविता:- ना धो महानोर**

**३ .हरपले श्रेय:- केशवसुत**

**४. विशाखा:- कुसुमाग्रज**

**५. फुलराणी बालकवींची:- संपादक कुसुमाग्रज**
**निवडक कविता:**